कार्यालयीन आदेश

जा.क्र.का.अ./मुं.मं./बीडीडी- /४९५ /२०१९
दिनांक :- ०६/०५/२०१९

विषय :- नायगाव, ना.म.जोशी मार्ग व वरळी बीडीडी पुनर्विकास प्रकल्पातील पात्रता निश्चिती कार्यवाहीचे कामकाज व ना.म.जोशी मार्ग प्रकल्पातील ऑनलाईन पंजीकरणाचे कामकाज पाहणेबाबत.

संदर्भ :- सचिव / प्रा. यांचे आदेश क्र. ४४१ दि.१२-०२-२०१९.

बीडीडी पुनर्विकास प्रकल्पातील पात्रता निश्चितीचे कामकाज, ऑनलाईन पंजीकरण व इतर अनुषंगिक कामे सुकर होण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. ना.म.जोशी मार्ग प्रकल्पातील ऑनलाईन पंजीकरणाचे कामकाज सकाळी ८.०० ते रात्री ८.०० पर्यंत करावयाचे आहे. सदरील कामकाज उपसमाज विकास अधिकारी श्री.पी.सी.सुर्यवंशी यांनी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत पहावे. उपसमाज विकास अधिकारी श्री. संभाजी राणे यांनी ऑनलाईन पंजीकरणाचे कामकाज दुपारी १२.०० ते रात्री ८.०० पर्यंत पहावे.

२. ना.म.जोशी मार्ग प्रकल्पातील सक्षम प्राधिकारी निर्देशानुसार करावयाचे पात्रता निश्चित कार्यवाहीबाबतचे कामकाज उपसमाज विकास अधिकारी श्री. पी.सी.सुर्यवंशी यांनी पूर्ण वेळ पहावे. श्री.भिसे वैद्यकीय रजेवरुन रुजू झाल्यानंतर ना.म.जोशी मार्ग प्रकल्पाबाबत श्री.सुर्यवंशी यांच्यासमवेत संयुक्तपणे पात्रता निश्चितीचे कामकाज पाहतील.

३. नायगाव प्रकल्पातील पात्रता निश्चितीचे कामकाज, ऑनलाईन पंजीकरण व इतर अनुषंगिक कामे श्री.संभाजी राणे यांनी पहावयाचे आहे. याबाबत सक्षम प्राधिकारी यांच्या निर्देशानुसार काम करावे.

४. वरळी प्रकल्पातील पात्रता निश्चितीचे कामकाज, ऑनलाईन पंजीकरण व इतर अनुषंगिक कामे श्री.बी.एफ.कांबळे यांनी पहावयाचे आहे. याबाबत सक्षम प्राधिकारी यांच्या निर्देशानुसार काम करावे.

प्रकल्पातील संक्रमण गाळा वितरणाचे कामकाज, करारपत्राचा ऑनलाईन पंजीकरणाचे कामकाज, वरील उपसमाज विकास अधिकारी यांनी सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ यांच्या निर्देशानुसार करावयाचे आहे याची नोंद घ्यावी.

वरील आदेशाचे तंतोतंत पालन व्हावे.

(दीपेन्द्र सिंह कुशवाह)
मुख्य अधिकारी
मुंबई मंडळ

प्रती,
१) श्री.पी.सी.सुर्यवंशी, उपसमाज विकास अधिकारी
२) श्री.संभाजी राणे, उपसमाज विकास अधिकारी
३) श्री.बी.एफ.कांबळे, उपसमाज विकास अधिकारी
४) श्री.यु.एस.भिसे, उपसमाज विकास अधिकारी

Received by 14.5.19

प्रत : सचिव / प्रा. यांना माहितीसाठी.
प्रत : उपमुख्य अभियंता, बीडीडी / मुंबई मंडळ यांना माहितीसाठी.

desktop/f/shaikh/jainsir/Marathi letter105

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा घटक)

**MUMBAI HOUSING AND AREA DEVELOPMENT BOARD**

(A MHADA UNIT)

म्हाडा MHADA

जा.क्र.मुं.मं./का.अ./बीडीडी/ ४२० /२०१९

दिनांक :- ०८/ ०५/२०१९

प्रति,

श्री.पी.सी.सुर्यवंशी

उपसमाजविकास अधिकारी

बी.डी.डी. चाळ/पुनर्विकास प्रकल्प

साईट ऑफिस ना.म.जोशी मार्ग,

लोअर परेल, मुंबई -१३

विषय :- बी.डी.डी. चाळ ना.म.जोशी मार्ग पुनर्विकास प्रकल्प.

संदर्भ :- सौ.मालन महादेव आंबोळे यांचे दि.२५/०४/२०१९ चे सहमुख्य अधिकारी मुं.मं. यांना सादर केलेले संक्रमण गाळा बदलून देण्याबाबतचे निवेदन.

संदर्भीय पत्रान्वये बीडीडी चाळ ना.म.जोशी मार्ग येथील चाळ क्र.१२ व खो.क्र.३३ चे भाडेकरु सौ. मालन महादेव आंबोळे यांनी त्यांना वितरीत करण्यात आलेला प्रकाश कॉटन मिल संक्रमण शिबीरातील बावीसाव्या मजल्यावरील २२०९ गाळा बदलून मिळण्याबाबत सहमुख्य अधिकारी, मुं.मं. यांना विनंती केली आहे. सोबत मूळ निवेदन व त्यासोबत प्रसिध्द केलेली वितरणाची यादी व वितरणाआदेश जोडले आहे.

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प लाभार्थ्यांसाठी असून अर्जदाराची विनंती लक्षात घेता सहमुख्य अधिकारी यांच्या मार्गदर्शन घेवून व उपलब्ध रिक्त संक्रमण गाळयांचा अर्जदारास पर्याय देवून पाहिजे असलेला गाळा देण्यात यावा.

आपल्या माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

सोबत :- वरीलप्रमाणे.

कार्यकारी अभियंता

बीडीडी / मुं.मं.

प्रत : सहमुख्य अधिकारी मुं.मं. यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : सौ. मालन महादेव आंबोळे, बीडीडी चाळ, ना.म.जोशी मार्ग, चाळ क्र.१२ व खो.क्र.३३, लोअर परेल, मुंबई यांना माहितीस्तव.

Received
14-5-19



F:\SHAIKH\BHADANGE\MARATHI & ENGLISH LETTERS & OFFICE NOTE\MARATHI LETTER.DOCX